# ।। ढुँडियाँ को संवाद ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ ढुँडियाँ को संवाद लिखंते ।।

।। साखी ।।

**दया पाळ इण नांव बिन ।। जीव मोख किम जाय ।।**
**क्हे सुखदेव सुण ढुंडियां ।। याँ को भेव बताय ।।१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जैन साधू(ढुंढियाँ)ला विचारतात की,जैन साधू तुम्ही देहाने कोणाची जाणते-अजानते हिंसा होऊ नये याचा विचार करुन मनाने आणि तनाने दया पाळतात आणि दया पाळल्याने आवागमनाच्या चक्रातून निघून मोक्षाला पोहचून जाल हा विचार करत असा तर मोक्षाला पोहचविणारे केवल नाम रटल्या शिवाय दया पाळल्याने मोक्षाला कसे पोहचाल हा भेद मला समजवा. ।।१।।

**दया पुंन को मूळ हे ।। पुंन भुक्तो देहे धार ।।**
**क्हे सुखदेव सुण ध्रम सुं ।। किस बिध उत्तरे पार ।।२।।**

मायेमध्ये जसे क्रुरता पाळणे हे पापाचे मूळ आहे. तसेच मायेत दया पाळणे हे पुण्य होण्याचे मूळ आहे.क्रुरतेने तसे मायेचा देह धारण करुन नरकात पाप भोगावे लागते तसेच दयेमुळे पाच तत्वाचा मायेचा देह धारण करुन स्वर्गात पुण्य भोगावे लागते.असे मायेच्या दया धर्माने मायेच्या पलिकडे केवलमध्ये कसे पोहचाल?माया तर केवल मध्ये पोहचत नाही मग मायेने काळाच्या पलिकडे कसे पोहचाल. ।।२।।

**नांव आसरे बाहिरो ।। जीव ब्रम्ह नही होय ।।**
**क्हे  सुखदेव सुण ढुँडियां ।। भेद बताऊँ तोय ।।३।।**

केवल नामाच्या आधारा शिवाय केवलमध्ये सामावण्यासारखा कोरा ब्रम्ह होत नाही. दया हा माया धर्म पाळल्याने जीवाचा मन,५ आत्मा आणि त्यांचे सर्व कर्म हे माया जीवब्रम्हाला सोडत नाही.याकारणाने जीव मायाच बनलेला राहतो.जीव ब्रम्ह बनत नाही. आदि सतगुरु सुखरामजी महाराज जैन साधू(ढुँढियाँ)ला सांगतात की,जीव ब्रम्ह हा दया कर्माने बनत नाही.तो ज्या केवल नामाच्या भेदाने बनतो तो भेद मला माहित आहे.तो मी तुला सांगतो आहे तु ते समज ।।३।।

**दया क्रम हे हद का ।। सुख दु:ख भुक्तो जोय ।।**
**क्हे सुखदेव बेहद कूं ।। नॉव न केवळ होय ।।४।।**

छरापरी पासून दोन पद आहेत हदचे मायेचे पद आणि दुसरे मायेच्या पलिकडील केवलचे पद मायेचे हदचे पद हे आदि पासून काळाच्या मुखात आहे आणि केवलचे बेहदचे पद हे आदि पासून काळाच्या पलिकडे आहे.दया कर्म हे हद्दीमध्ये म्हणजे काळाच्या मुखात ठेवणारा कर्म आहे.या दया कर्माने शरीर सुटल्यानंतर स्वर्गात मायेचे सुख आणि जन्म -मरणाचे काळाचे दु:ख जगात भोगतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज जैन साधू

(ढुँढियाँ)ला सांगतात की,जेथे जन्म–मरणाचे दु:ख नाही अशा बेहद पदात न केवल नामानेच जीव जाऊ शकतो.अन्य कोणत्या विधीने पोहचू शकत नाही. ।।४।।

**दया कहाँ लग पाळसी ।। सुण समझाऊँ तोय ।।**
**जीव बिना सुखराम क्हे ।। जीव न जीवे कोय ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जैन साधू(ढुँढियाँ)ला सांगतात की,तुम्ही दया पाळतात ती दया पाळण्याची ही मर्यादा आहे.साधक दया काही मर्यादेच्या पलिकडे पाळू शकत नाही.जसे ज्याने ज्याने मायेचे शरीर धारण केले आहे त्याला जीवच खावे लागतात. जीव नाही खाल्ले तर जीव जिवंतच राहत नाही,मरुन जातो.फरक इतकाच आहे की, दया पाळणारा मनुष्य त्याला कमीत कमी कष्ट पडतील असे गहू,तांदूळ,डाळ असे जीव खातो तर क्रुर मनुष्य चालता–फिरता ज्यांना कापतांना महाकष्ट होतात असे ग्रहण करतात.परंतु दया पाळणारा आणि क्रुर दोन्ही ही जीवच ग्रहण करतात.अशा प्रकारे दया पाळणाऱ्यांना बिना जीव खाल्ल्याशिवाय जिवंत राहण संभव नाही आणि जीव खाल्ल्यावर केलेले पाप मायेच्या जगात भोगल्या शिवाय सुटत नाही. ।।५।।

**पाँच तत्त को आप ही ।। करो पाँच कोई अहार ।।**
**दया पाळे किण रीत सूं ।। क्हे सुखदेव बिचार ।।६।।**

प्रत्येक जीव,आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वी या पाच तत्वांचे बनले आहे.या जीवाचे पाच तत्व जिवंत ठेवण्याकरीता पाच तत्वाचा आहार द्यावा लागतो आणि तो आहार पाच तत्व आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वी या तत्वांपासून सरळ मिळत नाही.ते पाच तत्वाच्या बनलेल्या जीवाच्या देहानेच घ्यावे लागतो.म्हणून जीवाला जिवंत ठेवण्या करीता जीव खावा लागतो आणि जीव खातात तर जीव मरतात असे मारण्यात दया कोणत्या रीतीने पाळली जाते.ही गोष्ट जैनसाधू तुम्ही मला समजवा असे आदी सतगुरु सुखरामजी महाराज जैन साधूला विचारतात. ।।६।।

**नव लख जळ मे जीव हे ।। सो पीवो तम आँण ।।**
**क्हे सुखदेव सुण ढुँड्या ।। दया किसी बिध जाँण ।।७।।**

सर्व केवली संत,जैन धर्म तसेच वेद शास्त्र पुराण हे सर्व सांगतात की,९ लाख जीव पाण्यात रमतात,राहतात,जन्मतात,मरतात.त्यांच्यापासून जन्मलेले अंडे पाण्यातच राहतात आणि पाण्यातच मोठे होतात.तेच पाणी तुम्ही पितात.पाणी पिल्याने पाण्यात राहणाऱ्या जीवांवर दया होते का त्या जीवांची हिंसा होते.हे समजा आणि दया होते तर कशी होते?हे मला ज्ञानाने समजवा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जैनसाधू(ढुँढियाँ) ला विचारले. ।।७।।

**सरब जीव सम जीव जळ ।। सो पीवो कन नांहे ।।**

क्हे सुखदेव सुण ढुँडिया ।। समझ सोच मन मांहे ।।८।।

सर्व अन्य पाच तत्वाच्या जीवां सारखेच पाच तत्वाचे जीव पाण्यात राहतात.तसेच पाणी तुम्ही पितात.ज्याच्याने जाणते-अजाणते डोळ्यांनी न दिसणारे जीव पाण्याद्वारे पोटात येतात.ते जीव तुमच्या पोटातच पोटाच्या ॲसिडने मरतात.जीव मेले की हिंसा होते मग जीवांवर दया कशी पाळली जाते?हे निजमनात ज्ञानाने समजून उमजून तुम्ही जैनसाधू (ढुँढियाँ)मला सांगा?असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जैनसाधूला विचारतात.।८।

पिरथी का सुण जीव रे ।। बीस लाख सुण होय ।।

क्हे सुखदेव धर पर चलो ।। दया कहाँ रही जोय ।।९।।

असेच २० लाख प्रकारचे जीव पृथ्वीवर राहतात.काही जीव मुंगी,माकोड्यापेक्षा ही छोटे राहतात.तुम्ही धरतीवर एका जागेहून दुसऱ्या जागेवर चालत जातात त्याच्यात मीव मरतात.हे डोळ्यांनी दिसते तरी ही जीव मरु नये हे टाळल्यावर ही प्रत्येक वेळी टाळले जात नाही.कोठे ना कोठे परिस्थिती वश जीव मरतातच मरतात.मग जीवांवर कोरी दया कोठे राहीली?हे मला समजवा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जैन साधूला विचारुन राहीले. ।।९।।

जीव दया के कारणे ।। मुख बुँद्यो तम आय ।।

क्हे सुखदेव नासा खुली ।। दया कांहाँ तम माय ।।१०।।

जीवांवर दया ठेवण्याकरीता मुखातून निघालेले बाष्प वायुने सुक्ष्म जीव मरु नये म्हणून तोंडावर पटट्री बांधतात.परंतु जिवंत राहण्या करीता श्वास घेण्या-सोडण्याकरीता नाक मोकळे ठेवावे लागते.जितका श्वास तोंडाने सोडत होते तितकाच श्वास नाकाने सोडतात, कमी नाही सोडत.जर तोंडाने श्वास सोडल्याने सुक्ष्म जीव मरतात तर नाकाने श्वास सोडल्यावर ही काहीना काही सुक्ष्म जीव करतीलच मग तोंडाला पटट्री बांधल्याने हिंसा कोठे थांबली?हिंसा झाली मग तुमचा दया पाळण्याचा कर्म कोठे झाला?हे तुम्ही मला सांगा असे आदी सतगुरु सुखरामजी महाराज जैन साधूला विचारुन राहिले आहेत. ।।१०।।

पाँच आत्मा आप मे ।। जे कस मारो नित ।।

क्हे सुखदेव सुण ढुँडिया ।। कांहा दया पर चित ।।११।।

आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वी पासून बनलेल्या पाची आत्मा तुझ्या देहात देहा सोबत आल्या आहेत.तुम्ही या आत्म्यांना चित्त ठेवून म्हणजे लक्ष ठेवून नित्य तापवतात, कष्ट देतात आणि तुम्हीच ज्ञानाने सांगतात की ही हींसा आहे,दया नाही मग असे कर्म करण्यात तुमच्या चित्तात दया कोठे आहे?हे मला समजवा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जैन साधूला सांगितले. ।।११।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

प्रथम पांचुँ आतमा ।। सुण तेरे हे घट माँय ।।
क्हे सुखदेव याँने कसो ।। दया किसी बिध क्राय ।।१२।।

जन्मताच पाच आत्मा तुमच्या देहात आल्या आहेत.अन्य कोणावर दया काण्याचे सर्व प्रथम तर पाची आत्म्यावर दयेने सुरुवात व्हायला पाहिजे.तसे तर नाही करत उलट त्यांना कष्ट देतात मग तुमच्यात दया कोठून आली?हे मला समजवा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जैन साधूला सांगितले.।।१२।।

प्रथम कलपे बाप माय ।। जोरू रोवे जोय ।।
क्हे सुखदेव सुण ढुँडियां ।। दया रही कांहां तोय ।।१३।।

आई-वडिल म्हातारे आहेत.ते तुमच्या आसऱ्याच्या गरजेने तळमळून राहीलेत,पत्नी आहे तिला पतीच्या आसऱ्याची गरज आहे.पुत्र-पुत्री आहे त्यांना पित्याच्या आसऱ्याची गरज आहे.हे सर्व रडत आहेत आणि तुम्ही त्यांना तळमळत,रडत सोडून वेष धारण केला आहे.अशाप्रकारे वेष धारण करण्यात दया कोठे राहीली?हे मला समजवा असे आदी सतगुरु सुखरामजी महाराजांनी साधूला सांगितले. ।।१३।।

तिरपणी में जळ न्हावता ।। मारो जीव अपार ।।
क्हे सुखदेव सुण ढुँडियां ।। दया कांहा तम लार ।।१४।।

लाकडापासून बनलेल्या तिरपनीच्या (कमंडलच्या) पाण्याने स्नान करतात. त्याच्यात असंख्य जीव मारतात तर तुमच्यात दया कोठे राहीली हे मला ज्ञानाने समजवा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जैन साधूला विचारले. ।।१४।।

दया क्षमा अर शील कूं ।। सजे सुरग नर जाय ।।
क्हे सुखदेव सुण ढुँडियां ।। बिषे रस वाँ खाय ।।१५।।

या,क्षमा तसेच शील जो साधतो आहे आणि स्वर्गात पोहचतो आहे आणि तेथे जावून विषयरस खातो आहे.तो महानिर्वाणपदात पोहचत नाही.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जैनसाधूला सांगितले. ।।१५।।

शीळ तप कूँ साज के ।। सुरग लोक नर जाय ।।
यांहा छाडे सुखराम के ।। देव लोक में खाय ।।१६।।

असे शील,तपाला साधणारा साधक स्वर्गलोकात जातो आणि तेथे येथे जे विषयरस त्यागले होते तेच पोट भरुन नाना विधीने खातो.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जैनसाधूला सांगितले. ।।१६।।

देव लोक सुख भुक्त के ।। उलट पड़े धर आय ।।
पीछे सुण सुखराम के ।। चहुँ खाण मे जाय ।।१७।।

तो साधक देवलोकात विषयरसाचे सुख भोगतो आणि तेथे तपाने प्राप्त झालेले पुण्य

संपल्यानंतर धरतीवर येवून जरायुज,अंड्ज,अंकुर,उद्विज असे चार खाणींचे ८४,००,००० योनीत ८३,२०,००० वर्षां पर्यंत जन्म–मरणाचे पल–पल दुःख भोगतो हे तु समज असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जैनसाधूला सांगितले. ।।१७।।

**तपसूं उलटी इंद्रियां ।। बळा कार सुण होय ।।**
**क्हे सुखदेव बिन नांवरे ।। मुक्त न व्हेली कोय ।।१८।।**

वासनेतून मुक्त होण्याकरीता जीव शील,तप करतात परंतु शील,तपाने मनुष्याने इंद्रिय निर्बल होत नाही.उलट बलवान बनतात.अशा कारणाने जीव वासनेतून मुक्त होवून केवल वैरागी नाही बनत.केवल वैरागी फक्त केवल नामाने होतो.केवल नाम सोडून अन्य कोणत्या विधिने वैरागी बनत नाही.उलट जास्त विषयांचा वासनिक बनतो आणि आवागमनात राहून दुःख भोगतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जैन साधूला समजावून राहीले आहेत .।।१८।।

**में तुज बूजुं ढुँडिया ।। यां को अरथ निहार ।।**
**चादर ओघो तिरपणी ।। यां सिर ही क्रतार ।।१९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जैन साधू(ढुँढियाँ)ला ज्ञानाने विचार करायला सांगतात की,तुम्ही चादर ओढण्यासाठी उपयोग करतात पाण्यासाठी तिरपणी ठेवतात. हे चादर तिरपणी वस्तुला बनविणारा आणखी कोणी कर्तार आहे किंवा नाही हे ध्यानात आणा. ।।१९।।

**प्रोटण हारा क्रम हे ।। घड़िया सो करतार ।।**
**काठ सूत ज्यूं ब्रम्ह हे ।। जळ ज्यूं शिर भरतार ।।२०।।**

प्रोटनहारा म्हणजे तिरपनी चादर हे कर्म आहे.तिरपनी चादर घडविणारा काठ व सुत आहे म्हणजे काळ सुत यांचा कर्तार आहे.या काठ व सुताला घडविणारे पाणी आहे व पाण्याला घडविणारा सतस्वरुप ब्रम्ह आहे. ।।२०।।

**जळ उपर ज्युँ तेज हे ।। तेज ऊपरे बाय ।।**
**बाय ऊपरे आकाश ज्यूँ ।। ता शिर अवगत गाय ।।२१।।**

जसे पाण्याच्या वर पाण्याला घडविणारी अग्नी माया आहे,अग्नीच्या वर अग्नीला घडविणारी वायु माया आहे,वायुच्यावर वायुला घडविणारी आकाश माया आहे,तसेच आकाश मायेच्या वर आकाश मायेला घडविणारा अविगत आहे हे ज्ञानाने समजा. ।।२१।।

**तन को खावंद स्वास हे ।। सासा अंछया होय ।।**
**अंछया खावंद ब्रम्ह हे ।। क्रमा को मन जोय ।।२२।।**

देहाचा मालक श्वास आहे. कारण श्वास आहे तर देह जिवंत आहे. श्वासाची इच्छा हा

मालक आहे.इच्छेचा सतस्वरुप ब्रम्ह हा मालक आहे आणि अशाच प्रकारे कर्माचा मालक मन आहे मन चाहतो तसे जीव कर्म करतो. ।।२२।।

**आद जिके दिन ऊपना ।। तब क्या क्रम था लार ।।**
**किण सूं पांचुँ प्रगटया ।। सो मुझ कहो बिचार ।।२३।।**

हा जीव आदि सर्वप्रथम ज्या दिवशी उत्पन्न झाला.त्यावेळी जीवा सोबत कोणतेही आधीचे केले गेलेले कर्म नव्हते.कर्म तर जीव उत्पन्न झाल्या नंतर झाले मग हे पाची तत्व आकाश ,वायु,अग्नी,जल,पृथ्वी कश्याने उत्पन्न झाले याचा ज्ञानाने विचार करुन मला सांगा. ।।२३।।

**म्हाप्रळे में पाँच ही ।। बिले होय सब जाण ।।**
**पाछा क्याँ सूं प्रगटे ।। सो बिध कहे मुज आण ।।२४।।**

प्रत्येक महाप्रलयात पाची तत्व समाप्त होवून जातात आणि हे पुन: कोण प्रगट करतात हे मला ज्ञान विधिने समजवा. ।।२४।।

**भीड़ पड़े तब देव में ।। जब सुर करे पुकार ।।**
**क्हे सुखदेवजी जब प्रगटे ।। सांई सिरझण हार ।।२५।।**

कुंडल्यो ।।

ब्रम्हा,विष्णू,महादेव या देवतांवर जेंव्हा संकट पडतात.तेंव्हा हे देवता कोणाची पुकार करतात?पुकार केल्यावर कोण प्रगट होते?तो आहे सर्वांचा सिरजन हार म्हणजे करतात म्हणजे उत्पत्ती करणारा केवल त्याच्या नावाचे रटण केल्याने काळाच्या दु:खातून जीव मुक्त होतो.तेंव्हा त्याचा धरतीवर चार खाणींमध्ये जन्म घेण्याचा चक्कर सुटतो आणि तो जीव जेथे काळ पोहचत नाही,कर्म पोहचत नाही अशा महानिर्वाण पदात पोहचतो.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जैनसाधूला सांगितले.।।२५।।

**ज्ञान खड़ग अर आगरे ।। एेता पखा न कोय ।।**
**ज्यां ज्यां सेऱ्यां साँचरे ।। त्यां त्यां सेंपट होय ।।२६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानाने जैनसाधूला समजावतात की,ज्ञान,तलवार आणि आग या तिघांचा कोणता पक्ष नाही.हे तिघेही जिकडे–जिकडे जातील तिकडे–तिकडे नष्ट करत जातील. ।।२६।।

**त्यां त्या संपट होय ।। आ परो कबून जाणे ।।**
**आ अणभे की रीत ।। न्याव अरथां पर आणे ।।२७।।**

हे तिन्ही ही हा आपला आहे किंवा परका आहे असे कधी जाणत नाही.हे तिन्ही कोणाचा पक्ष घेत नाही.अशाच प्रकारचे अनभय ज्ञान म्हणजे केवल ज्ञानाची रीत आहे.हे अनभे ज्ञान म्हणजे केवल ज्ञानाची रीत आहे.हे अनभे ज्ञान म्हणजे केवल ज्ञान

माया काय,काळ काय,विज्ञान वैरागी सतस्वरुप काय याच्यांतील वेग-वेगळे अंतर सांगून महानिर्वाण सतस्वरुपाचे वैराग्य विज्ञानावर जीवाची समज आणतो.ही समज अनभे विज्ञानी आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जगातील जैन स्त्री-पुरुष,ज्ञानी, ध्यानी तसेच जगातील सर्व अन्य स्त्री-पुरुष ज्ञानी,ध्यानींना आणण्यास समजावून राहीले आहे. ।।२७।।

**यां मे बुरो न मानिये ।। जे कजी आप में होय ।।**
**ज्ञान खड्ग अर आगरे ।। एता पखा न कोय ।।२८।।**

(पक्षपात कोणाशीही ठेवणार नाही.)याच्यात कोणी वाईट मानू नका.आपल्या आतच जर कसर(कमी)आहे.तर हे ज्ञान,कोणाचाही पक्षपात न करता,सत्य सांगेल.(आपल्या आत कसर असल्याने त्याचे वाईट न मानता,आपली कसर काढून टाकली पाहिजे) कारण ज्ञान, तलवार आणि आग हे तिन्ही ही पक्षपात करीत नाही. ।।२८।।

**में तुज बूझुँ ढुँडियां**

**में तुज बूझुँ ढुँडियां ।। मूवा जळ किम होय ।।**
**भेद बतायर चालियो ।। गुरू की सोगन तोय ।।टेर।।**

आदी सतगुरु सुखरामजी महाराजांना जैनसाधू ने सांगितले की,आम्ही जे पाणी पितो ते पाणी मृतक असते म्हणजे जगातील स्त्री-पुरुषांच्या कामाचे राहत नाही.तेंव्हा आदी सतगुरु सुखरामजी महाराजांनी जैनसाधूला विचारले की जगातील स्त्री-पुरुषांना कामात येत नाही.म्हणून पाणी मरते.हे कसे होऊ शकते?याचा भेद मला सांगा.जैन साधू पाणी कसे मृतक होते हा भेद न सांगता क्रोधात येऊन जाऊ लागतो तेंव्हा त्याला ज्ञानाने खरे समजावे म्हणून त्याला त्याच्या गुरुची शपथ देऊन थांबवतात.ते पुढे ज्ञान चर्चा वाढवतात.(राजस्थानामध्ये गुरुला फार महत्व असते.गुरुची शपथ हे सर्वात मोठे अरच असते)।।टेर।।

**पाप पुन्न बिन दोस सूं ।। किस बिध जीमे आण ।।**
**निकमो अन किम जायसी ।। सो मुज कहोनी बखाण ।।१।।**

आदी सतगुरु सुखरामजी महाराजांना जैन साधू सांगतो की,आम्ही जे अन्न खातो. त्याच्यात पुण्य राहत नाही.हे अन्न ज्याच्या घरात बनले आहे,त्यांच्या आवश्यकते पेक्षा जास्त असते असे बेकार कोणाच्या कामात न पड्णारे अन्न असते.यावर आदी सतगुरु सुखरामजी महाराजांनी त्याला विचारले की,जीवा शिवाय अन्नच बनत नाही तर तो स्वयंपाक केल्याशिवाय मनुष्य जेवण नाही करु शकत(खाऊ)म्हणजे जेवणा करीता बनवलेला स्वयंपाक बिना पापाचा राहत नाही.तो घराकरीता त्यांच्या आवश्यकते पेक्षा जास्त आहे.परंतु तुम्ही सोडून अन्य कोणी ही खाईल तर त्याची भुक मिटेल की

नाही?जसे घराला सोडून तेच भोजन दुसऱ्याच्या भुख मिटवण्याच्या कामी येते.तसे तुमच्या कामी आले मग त अन्न निकम्मे कसे झाले?ते अन्न कोणत्या कामात येऊ शकते म्हणजे निकम्मे झाले नाही.जर निकम्मे नाही तर त्याच्यातील जीव मरण्याचे पाप दोष नष्ट ही नाही झाले.मग ते अन्न खाईल त्याला हे पाप दोष लागतील म्हणजे लागतीलच.याच्यात काही फरक नाही हे ज्ञानाने समजा. ।।१।।

**तुं पीवे जिण नीर कूं ।। पावे बन कूं लाय ।।**
**वो फळ फूलां आवसी ।। कन वो निर्फळ जाय ।।२।।**

आम्ही मेलेले पाणी म्हणजे कोणाच्या कामात न येणारे पाणी पितो असे तुम्ही म्हणतात जर तेच पाणी मनुष्य जींवाना सोडून झाडांझुडूपाच्या जीवांना दिले तर त्या झाडां-झुडूपाची तहान मिटेल की नाही?ते पाणी पिल्याने झाडाना जिवंत झाडा सारखे फळ-फुल येतील की नाही?का मेलेल्या झाडा सारखे फळ-फुल येणार नाही असे होईल का?हे मला ज्ञानाने समजवा.जर हे पाणी झाडे झुडपे पिल्याने यांना फळ-फुल येतात तर ते पाणी निकम्मे कसे झाले?हे समजा. ।।२।।

**तुज कूं देवे रोटियां ।। ज्याँ ने पुन कन पाप ।।**
**दोष कीसि बिध टाळिया ।। ओ अरथ कीजे आप ।।३।।**

तुम्हाला जे भाकरी(अन्न)देतात असे भाकरी(अन्न)देणाऱ्याला पुण्य लागते का पाप लागते.जर पुण्य लागते आहे तर हे दुसऱ्याला म्हणजे कर्म तुमच्यावर दोषाच्या रुपात कसे उभे राहीले मग या कर्म दोषाला कसे निर्दोष कराल?याची समज तुम्ही करा आणि मला समजवा. ।।३।।

**मुख सूं झाळा नास मे ।। बहे इधक करूर ।।**
**मुख रोक्या सूं क्या भयो ।। जीव तुं हते जरूर ।।४।।**

तुम्ही सांगतात की मुखाने बाष्प सोडल्यावर सुक्ष्म जीव मरतात म्हणून अशा गरम बाष्पाला थांबवण्याकरीता तोंडाला बांधून घेतले आहे आणि तेच बाष्प नाकाने सोडले आहे परंतु विज्ञान हे सांगते की नाकाने बाष्प निघते ते बाष्प मुखाच्या बाष्पा पेक्षा उष्ण असते म्हणजे जे बाष्प नाकाने सोडतात त्या बाष्पाने ही जीव तर निश्चितच जरुर मरतात.मग तोंडा पट्टी बांधल्याने तुमच्या देहाने जीवाचे मरणे कोठे थांबले?हे मला समजवा ।।४।।

**वास किया सूं दोष रे ।। जे सुण उतरे जाय ।।**
**तो सिंघ जासी मोख ने ।। वो दिन तीसरे खाय ।।५।।**

तुम्ही सांगतात की उपवास केल्याने जीव भवसागरातून पार उतरुन जातो.असे जर आहे तर ज्ञानाने समजा की सिंह कुद्रतीच प्रत्येक तिसऱ्या दिवशी खातो,सहजमध्ये,बिना

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

कष्टाने उपवास करतो म्हणजे उपवासाने पार उतरले गेले असते तर सर्वात आधी सिंह सहजमध्ये भवसागरातून पार झालेला असता.परंतु तसे होत नाही.तो पुढच्या योनीत पाप भोगायला ८४,००,००० योनीचे एक शरीर धारण करतो हे ज्ञानाने समजमध्ये आणा. ।।५।।

**ऐ प्रपंच सब छाड दे ।। सिंवरो सिरजण हार ।।**
**केहे सुखदेव सुण ढुँडिया ।। ज्युँ तुम उतरे पार ।।६।।**

हया सर्व वस्तु ज्ञानाने समजा आणि मायेत राहण्याचे हे सर्व प्रपंच सोडून दया आणि तुम्हाला ज्याने घडविले अशा सिरजनहार केवलचे स्मरण करा.फक्त त्याचे स्मरण केल्यानेच तुम्ही भवसागरातून पार उतराल अणिक कोणत्या उपायांने पार नाही होणार. त्याचे स्मरण केल्याने परत कधी मायेत जन्मणार नाही.आणि सदा करीता महानिर्वाण पदावर निश्चल राहाल.असे आदी सतगुरु सुखरामजी महाराजांनी जैनसाधू (ढुँढियाँ) ला ज्ञानाने वेग–वेगळ्या प्रकारे समजविले. ।।६।। ।। इति ढुंडियां को संवाद संपूरण ।।